# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २७/०७/२०२३ (गुरूवार)

---

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन देवलापार** :— अंतर्गत वडंबा ०२ किमी उत्तर, येथे दिनांक २६.०७.२३ चे १७.३० ते १७.४५ वा दरम्यान, आपले स्वताचे पांढ—या रंगाचे महींन्द्रा केयुवी कार क्र एम पी २० सी एच २४०७ ने नागपुर जबलपुर रोडने देवलापार कडुन मानेगाव टेक कडे जात असता त्याचे ताब्यातील कारचे समोरील डाव्या साईडचे टायर फुटल्याने गाडी लहरत लहरत एम एच ४४ रोडचे बाजुचे डिवायडर व डिवायडर वरील साईड रॅलींगला धडकुन साईड रॅलींग तोडुन सर्विस रोडवरील बोर्डाला धडकुन अपघात होवुन कार चालक आयुष मदन अग्रवाल वय ३० वर्ष रा लखनादौन मध्यप्रदेश हा मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मनोज राजकुमार दुबे वय ४३ वर्ष रा वडंबा तह रामटेक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग नोंद केला आहे. सदर मर्ग चा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री घोडके मो क्र ८१७७९०७००४ पोस्टे कुही हे करीत आहे.

## दुखापत

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— अंतर्गत ब्राम्हणवाडा तह कळमेश्वर १३ किमी पुर्व, येथील फिर्यादी व आरोपी लोक एकाच मोहल्यात राहतात. दिनांक २३.७.२३ चे २०.३० ते २०.४० वा दरम्यान, फिर्यादीची आई घरच्या बक—या चारून रोडने येत असता रोडनी ट्रक आल्याने सर्व बक—या आरोपीचे कंपाउंड मध्ये गेल्या, यावरून आरोपी क्र १ चे पत्नीने फिर्यादीचे आईसोबत भांडण केले. तसेच रात्री २०.३० वा आरोपी हा फिर्यादीचे घरासमोर शिवीगाळ करू लागला तसेच आरोपी क्र २ व ३ यांनी सुध्दा फिर्यादी सोबत झगडा भांडण केले तसेच आरोपी क्र १ याने त्याचे हातात असलेल्या लाकडी दांडयाने फिर्यादीचे छातीवर मारून जखमी केली. तसेच आरोपी क्र ४ याने बक—या घेवुन जाण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—अजय रामप्रसाद धुर्वे वय २६ वर्ष रा. ब्राम्हणवाडा तह कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी क्र १. रतन ककोडीया २. बिरला ककोडीया ३. संदीप ककोडीया ४. राजकुमार ककोडीया सर्व रा ब्राम्हणवाडा तह कळमेश्वर यांचे विरूध्द कलम ३२४,५०४,५०६,३४ भादवि चा गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस पो हवा धनराज भुक्ते मो क्र ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**